# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिंसेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित **राज्य विद्यापीठ**)

## महाविद्यालय विकास विभाग

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॉम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉईंट मार्ग, नागपूर - ४४००३३
दुरध्वनी क्रमांक: ०७१२-२५२९९३२ फॅक्स नं: ०७१२-२५५५७०१, E-mail ID: infoarcollege@ymail.com

**क्र.म.वि.वि/२०२४-२५/शिमा/भ/223** **दिनांक : 04-07-2024**

**प्रती,**

**अध्यक्ष/सचिव,**
प्रियदर्शनि स्पोर्टस अँड कल्चरल **क्लब, नागपूर**
स्टेशन रोड

**विषय :-** कार्यकारी प्राचार्यांना मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ:-** **आपले पत्र क्र. निरंक** दिनांक **02-07-2024**

महोदय/महोदया,

आपल्या संदर्भांकित प्रस्तावानुसार आपल्या संस्थेद्वारा संचालीत **आठवले समाजकार्य महाविद्यालय, स्टेशन रोड भंडारा ता.- भंडारा, जि.- भंडारा - 441904** या महाविद्यालयातील सेवाजेष्ठ शिक्षक **डॉ.नरेश शालीकराम कोलते** यांना सत्र **२०२४-२५** पर्यंत खालील अटींचे अधिनस्थ कार्यकारी प्राचार्य म्हणुन मा. प्र-कुलगुरुंनी मान्यता प्रदान केली आहे.

१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०८ नुसार व अध्यादेश क्र. २४ मधील परिच्छेद क्र. ४२ प्रमाणे महाविद्यालयाने प्राचार्य व अधिव्याख्यात्यांची नियुक्ती करणे अनिवार्य आहे. त्यानुसार नियमित प्राचार्य/अधिव्याख्यात्याची नियुक्तीची संपूर्ण प्रक्रिया त्वरित शैक्षणिक सत्र सुरु होण्यापुर्वी पुर्ण करावी.

२) कार्यभारानुसार व विषयानुसार आवश्यक अधिव्याख्यात्यांची पदे आपणाकडुन भरण्यात आली नसल्यास ती त्वरीत भरावी अन्यथा यासंबंधी शिक्षण संचालक उच्च शिक्षण / एन.सी.टी.ई. / ए.आय.सी.टी.ई. / बार कौन्सिल ऑफ इंडिया या केंद्रीय परिषदेकडे वस्तुस्थिती कळविण्यात येईल, तसेच पुढील शैक्षणिक सत्रातील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याविषयी गांभीर्याने विचार करण्यात येईल.

३) प्राचार्य / अधिव्याख्यात्या निवड प्रक्रिया आपण निर्धारित कालावधीत पुर्ण न केल्यास निरंतर संलग्नकरणाची प्रक्रिया प्रलंबित ठेवण्याबाबत कार्यवाही घेण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची/महाविद्यालयाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

( डॉ.रमण मदने )
उपकुलसचिव
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ,नागपूर

प्रतिलीपी माहितीकरीता **व योग्य कार्यवाहीस्तव अग्रेषीत :**

१) मा.सहसंचालक, तंत्र शिक्षण, नागपूर विभाग,नागपूर.